

दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २५८ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शुक्रवार २३/१०/२०२६ । पाने- ६



जिल्हा बँकेत बिनविरोधचा बार फुसका!

९ बिनविरोध, १२ जागांसाठी निवडणूक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर: अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या २१ संचालक पदांसाठी सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेत अखेर बिनविरोध निवडीचे गणित फिस्कटले आहे. अर्ज माघारीच्या अंतिम दिवशी बुधवारी (दि. २१ ऑक्टोबर) मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. २१ पैकी आठ जागा बिनविरोध झाल्या असल्या, तरी उर्वरित १३ जागांसाठी निवडणूक अटळ झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय समीकरणे तापली असून अनेक मतदारसंघांत दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या निगराणीत गुरुवारी (दि. २२ ऑक्टोबर) उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप होणार आहे.

अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात उमेदवार, समर्थक आणि राजकीय कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. कोण माघार घेणार, कोण मैदानात कायम राहणार आणि कोणत्या जागा बिनविरोध होणार, याबाबत शेवटच्या क्षणापर्यंत उत्सुकता कायम होती. सुरुवातीला जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, अखेरच्या टप्प्यातील घडामोडींमुळे हे चित्र बदलले आणि अनेक मतदारसंघांत थेट संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली.

अकोलेत लहामटे विरुद्ध गायकर कुटुंबातील संजीवनी शिंदे

अकोले सोसायटी मतदारसंघातील लढत विशेष लक्षवेधी ठरणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) आमदार डॉ. किरण लहामटे यांच्याविरोधात जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम गायकर यांच्या कन्या संजीवनी गोविंद शिंदे मैदानात आहेत. गेल्या तीन दशकांपासून जिल्हा बँकेच्या सत्ताकारणात प्रभाव राखणाऱ्या गायकर कुटुंबाच्या उमेदवाराविरोधात लहामटे यांनी थेट लढतीचा निर्णय घेतल्याने अकोल्यातील राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. विशेष म्हणजे, दोन्ही उमेदवार एकाच पक्षाशी संबंधित असल्याने या लढतीला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. तालुक्यात बिगरआदिवासी क्षेत्रात सुमारे ६५ टक्के, तर आदिवासी क्षेत्रात ३५ टक्के सहकारी सोसायट्या असल्याचे सांगितले जाते. या मतदारसंघात ८५ ठरावधारक मतदार असल्याने प्रत्येक मत निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे विजयासाठी दोन्ही बाजूंना मतांची जुळवाजुळव करावी लागणार आहे. दरम्यान, लहामटे आणि अमित भांगरे यांनी अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातून माघार घेतली आहे.

श्रीगोंद्यात पाचपुते-पानसरे यांच्यात काट्याची टक्कर

श्रीगोंदा सहकारी सोसायटी मतदारसंघात माजी आमदार राहुल जगताप यांनी माघार घेतल्याने लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. जिल्हा बँकेचे माजी संचालक दत्तात्रय पानसरे यांनी उमेदवारी कायम

जरांगेंना पर्सनल टार्गेट करा

विधानसभेत थर्ड फ्रंटचा फायदा होईल!

कथित ऑडिओ क्लिपने राज्यात खळबळ



जालना (वृत्तसंस्था)

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी कथित ऑडिओ क्लिप समोर आणत महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून दिली आहे. जरांगे यांना वैयक्तिकरीत्या लक्ष्य करणे, त्यांचा भाजपविरोधातील आक्रमक पवित्रा आणि आगामी विधानसभा निवडणुकीतील संभाव्य राजकीय समीकरणांचा फायदा घेणे, अशा आशयाची चर्चा या कथित क्लिपमध्ये असल्याचा दावा करण्यात आला आहे. या ऑडिओ क्लिपमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणीही जोर धरू शकते.

जरांगे यांनी माध्यमांसमोर ऐकवलेल्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये काही व्यक्तींमध्ये राजकीय रणनीतीसंदर्भात चर्चा होत असल्याचे सांगण्यात येत आहे. या चर्चेत एका महिलेचा आवाज असल्याचा दावा आहे. जरांगे यांचा वैयक्तिक रोख देवेंद्र फडणवीस आणि भाजपकडे राहू शकतो, तसेच आगामी विधानसभा निवडणुकीत ते स्वतंत्र राजकीय शक्ती म्हणून समोर आल्यास त्याचा काही राजकीय पक्षांना फायदा होऊ शकतो, अशा आशयाची विधाने या क्लिपमध्ये ऐकू येत असल्याचे सांगितले जाते. 'जरांगेंना पर्सनल टार्गेट कसे करता येईल, हे पाहिले पाहिजे,' तसेच विधानसभा निवडणुकीत ते थर्ड फ्रंट ठरू शकतात, अशा आशयाच्या कथित संभाषणामुळे राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना सुरुवात झाली आहे. मात्र, या क्लिपमधील आवाजांची ओळख, संभाषणाची सत्यता आणि त्याचा नेमका संदर्भ स्वतंत्रपणे पडताळला जाणे आवश्यक आहे.

या कथित ऑडिओ क्लिपमध्ये श्रीरामपूरमधील एका अनुसूचित जातीच्या मुलीच्या धर्मांतराचा मुद्दाही चर्चेत आल्याचे सांगितले जात आहे. अशा विषयांवर अधिक लक्ष केंद्रित करण्याची आणि ते राजकीय चर्चेत पुढे आणण्याची भूमिका संभाषणात मांडल्याचा दावा आहे. संभाजीनगरमधील एका विषयाचाही उल्लेख या चर्चेत झाल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, या कथित संभाषणातून कोणत्या व्यक्ती किंवा पक्षाची नेमकी भूमिका स्पष्ट होते, याबाबत अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे ऑडिओ क्लिपमधील दाव्यांची सत्यता तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे.

कथित संभाषणातील एका व्यक्तीने जरांगे आपल्याविरोधात बोलत असल्याचे आणि त्यांना आपल्यातीलच काही लोक मदत करत असल्याची माहिती मिळाल्याचे म्हटल्याचा दावा आहे. भाजपमधील काही नेत्यांकडून अशी मदत होत आहे का, तसेच हा कथित राजकीय डाव थर्ड फ्रंटच्या फायद्यासाठी आहे की देवेंद्र फडणवीस यांना बदनाम करण्यासाठी, असे प्रश्नही संभाषणात उपस्थित झाल्याचे सांगितले जाते. या दाव्यांमुळे राजकीय वर्तुळात संशयाचे वातावरण निर्माण झाले असले, तरी संबंधित व्यक्तींची अधिकृत भूमिका आणि क्लिपची सत्यता समोर येणे आवश्यक आहे.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या विरोधात मोठे षडयंत्र रचले जात असल्याचा आरोप केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन सत्य शोधावे, असे आवाहन त्यांनी केले. एकनाथ शिंदे यांनी मागितल्याप्रमाणे आपण पुरावे दिले असल्याचे सांगत, आता या प्रकरणाचा शोध घेण्याची जबाबदारी संबंधित नेत्यांची असल्याची भूमिका जरांगे यांनी मांडली. आपण चांगले काम करत असताना अशा संकटांना सामोरे जावे लागत असल्याचे सांगून त्यांनी या प्रकरणात वरिष्ठ नेतृत्वाने लक्ष घालण्याची मागणी केली.

मराठा आरक्षणाचा प्रश्न, जरांगे यांची राजकीय भूमिका आणि भाजपमधील संभाव्य अंतर्गत मतभेद या पार्श्वभूमीवर कथित ऑडिओ क्लिपने नव्या वादाला तोंड फोडले आहे. या क्लिपमधील संभाषण खरे आहे का, त्यामागे कोण आहे आणि कथित राजकीय रणनीतीचा प्रत्यक्षात काही संबंध आहे का, हे तपासातून स्पष्ट होणार आहे. आता या प्रकरणात सर्वांचे लक्ष तीन प्रश्नांकडे लागले आहे : कथित ऑडिओ क्लिपची सत्यता काय?














दहावी-बारावी उत्तीर्ण, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकासाची संधी

कोर्सनंतर नोकरीची हमी!, आधार फाउंडेशनच्या पुढाकारातून पुण्यात प्रशिक्षण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट राहिलेल्या तसेच दहावी-बारावीनंतर पुढील शिक्षण घेऊ न शकलेल्या गरजू तरुण-तरुणींसाठी कौशल्य विकासाच्या माध्यमातून रोजगाराची नवी संधी उपलब्ध झाली आहे. श्री व श्रीमती रामनारायणजी बुब मेमोरियल ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने पुणे येथे कौशल्य विकास अभ्यासक्रम राबविण्यात येणार असून, या उपक्रमासाठी संगमनेरमधील गरजू विद्यार्थ्यांची शिफारस आधार फाउंडेशनच्या माध्यमातून केली जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत दहावी-बारावी उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण विद्यार्थी, तसेच परिस्थितीमुळे आयटीआय, बी.ए. किंवा बी.कॉम.चे शिक्षण पूर्ण करू न शकलेले अथवा शिक्षण अर्धवट राहिलेले १८ वर्षे पूर्ण असलेले युवक-युवती अर्ज करू शकतात. विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार त्यांना कौशल्य विकास अभ्यासक्रम निवडण्याची संधी मिळणार आहे.

या प्रशिक्षण अभ्यासक्रमाची संपूर्ण फी संबंधित संस्था भरणार आहे. विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची (मेस) व्यवस्था सवलतीच्या दरात करण्यात येणार आहे. हा अभ्यासक्रम साधारण दोन ते चार महिन्यांचा असणार आहे. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना टाटा व इतर संबंधित अधिकृत संस्थांकडून प्रमाणपत्र दिले जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, अभ्यासक्रम पूर्ण क्षमतेने आणि १०० टक्के पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीची हमी संबंधित कंपनीकडून देण्यात येणार असल्याचे आधार फाउंडेशनने स्पष्ट केले आहे. त्यामुळे केवळ शैक्षणिक गुणांमुळे किंवा आर्थिक अडचणींमुळे मागे पडलेल्या युवक-युवतींना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी मिळू शकते.

संगमनेरमध्ये लवकरच मार्गदर्शन सेमिनार

या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम दिलेल्या ऑनलाइन लिंकवर आपली माहिती भरावी. त्यानंतर संगमनेर येथे मार्गदर्शन सेमिनार आयोजित करण्यात येणार असून, त्याची तारीख आणि आवश्यक कागदपत्रांबाबतची सविस्तर माहिती लवकरच कळविण्यात येईल.

प्रशिक्षणासाठी निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून अभ्यासक्रम पूर्ण करण्याबाबत आधार फाउंडेशनच्या कार्यालयामार्फत हमीपत्र घेतले जाणार आहे. पुण्यात दोन ते चार महिने राहून प्रशिक्षण पूर्ण करण्याची तयारी असलेल्या, शिस्त पाळणाऱ्या आणि रोजगारासाठी मेहनत घेण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांनीच अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे -

१. आधार कार्ड, २. पासपोर्ट आकाराचा फोटो,, ३. अंतिम शिक्षणाची उपलब्ध गुणपत्रिका किंवा प्रमाणपत्र, ४. आधार फाउंडेशनच्या कार्यालयातून मिळणारे हमीपत्र, ५. विनंती अर्ज.

अर्जाची अंतिम मुदत : २५ ऑक्टोबर २०२६.

संगमनेर शहरासह संपूर्ण तालुक्यातील ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि त्यांच्या पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी आधार फाउंडेशन, संगमनेर कार्यालयाशी ७२६३९२६०६० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

वृद्धेचे हरवलेले १५ हजार रुपये केले घरपोच

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर येथील बसस्थानक परिसरात सापडलेली सुमारे १५ हजार रुपयांची रक्कम, आधार कार्ड आणि बँक पासबुक पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयातील कर्मचारी भगवान शिंदे यांनी संबंधित वृद्ध महिलेचा शोध घेऊन थेट तिच्या घरी पोहोचविले. बुधवारी सायंकाळी मालदाड येथील अनुसया रामभाऊ गोफणे या वृद्ध महिला संगमनेर बसस्थानकावर आल्या होत्या. त्यांच्याकडील फडक्यात गुंडाळलेली सुमारे १५ हजार रुपयांची रक्कम, आधार कार्ड आणि बँक पासबुक बसस्थानक परिसरात पडले. मात्र, ही बाब त्यांच्या लक्षात आली नाही. दरम्यान, शिंदे हे नेहमीप्रमाणे आपल्या मित्रांसोबत चहा घेण्यासाठी बसस्थानक परिसरात आले

होते. यावेळी त्यांना एका फडक्यात गुंडाळलेली रक्कम आढळून आली. त्यामध्ये पैसे, आधार कार्ड आणि पासबुक होते. शिंदे यांनी आधार कार्डवरील माहितीच्या आधारे संबंधित महिलेचा शोध घेतला. त्यांनी दुसऱ्याच दिवशी मालदाड येथे जाऊन त्यांच्या घरी पैसे व कागदपत्रे सुपूर्द केली. शिंदे यांनी आपल्या कृतीतून माणुसकीचा आदर्श घालून दिला त्यांच्या या प्रामाणिकपणाचे कौतुक होत आहे.

उच्च न्यायालयात एकनाथ घोगरे यांची याचिका फेटाळली

डॉ. सुजय विखे यांचा जिल्हा बँकेतील मार्ग मोकळा!



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या उमेदवारीला आव्हान देणारी एकनाथ घोगरे यांची याचिका छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे डॉ. विखे पाटील यांच्या उमेदवारीवरील न्यायालयीन आव्हान दूर झाले असून, राहाता सेवा संस्था मतदारसंघातून जिल्हा बँकेच्या संचालकपदी त्यांची बिनविरोध निवड झाली आहे.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी डॉ. सुजय विखे पाटील यांनी राहाता सेवा संस्था मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या उमेदवारीवर विरोधी उमेदवार एकनाथ घोगरे यांनी हरकत घेतली होती. मात्र, निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांनी ही हरकत फेटाळून लावली. या निर्णयाविरोधात घोगरे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

या याचिकेवर न्यायमूर्ती मंजुषा अजय देशपांडे यांच्यासमोर अंतिम सुनावणी झाली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने घोगरे यांची याचिका फेटाळली. त्यामुळे डॉ. विखे पाटील यांच्या उमेदवारीला न्यायालयात दिलेले आव्हान निष्प्रभ ठरले. या प्रकरणात डॉ. सुजय विखे पाटील यांच्या वतीने ॲड. विनायक होन आणि ॲड. अभय ओस्तवाल यांनी बाजू मांडली. महाराष्ट्र शासनाच्या वतीने ॲड. सुभाष तांबे, तर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या वतीने ॲड. साहेबराव कदम यांनी काम पाहिले.

उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील या प्रकरणाला पूर्णविराम मिळाला आहे. राहाता सेवा संस्था मतदारसंघातून डॉ. सुजय विखे पाटील यांची संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याने जिल्हा बँकेच्या राजकीय समीकरणांच्या दृष्टीनेही या घडामोडीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

भंडारदरा धरणात आढळला तरुणाचा मृतदेह

युवावार्ता(प्रतिनिधी)- राजूर अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाच्या पाण्यामध्ये एका तरुणाचा मृतदेह तरंगताना आढळून आला आला. सदर व्यक्ती घरामधून चार दिवसांपासून बेपत्ता होती. मुरशेत येथील सखाराम देवजी अस्वले या तरुणाचा मृतदेह बुधवारी (दि. २१) भंडारदरा धरणामध्ये आढळून आला मयताचे साधारण वय ४० वर्षे आहे. याबाबत राजूर पोलीस ठाण्यात बेपत्ता तक्रार दाखल करण्यात आली होती. सदर घटनेची राजूर पोलिसांना माहिती मिळताच तत्काळ घटनेच्यास्थळी दाखल झाले. सदर तरुणाला स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने पाण्यामधून वर काढून शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुणालयात हलविण्यात आले.

सदर घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक परसराम तागड, हवालदार श्रीकांत नरोडे, पोलीस कॉन्स्टेबल संभाजी सांगळे हे करत असून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मागण्या मान्य न झाल्यास अकोले ते मुंबई लॉन्ग मार्च

किसान सभा व विविध संघटनांचा २६ ऑक्टोबरला वाहनांसह मुंबईकडे कूच करण्याचा इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी) : अकोले - दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान मिळावे, पीक विम्याची भरपाई तातडीने द्यावी, तसेच वनजमीन, देवस्थान आणि गायरान जमिनी कसणाऱ्यांच्या नावे कराव्यात, यांसह विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभा, सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (उखढण), अखिल भारतीय जनवादी महिला संघटना (-खऊअ-) आणि डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (ऊधत्रख) यांच्या वतीने अकोले तहसील कार्यालयासमोर राज्यव्यापी महामुक्काम सत्याग्रह सुरू करण्यात आला आहे.

२१ ते २६ ऑक्टोबरदरम्यान सुरू असलेल्या या आंदोलनातून शेतकरी, कामगार, महिला आणि श्रमिकांच्या प्रश्नांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. मागण्या मान्य न झाल्यास २६ ऑक्टोबर रोजी राज्यातील २१ जिल्ह्यांमधील हजारो शेतकरी ट्रॅक्टर, पिकअप व अन्य वाहनांसह अकोले येथे दाखल होऊन तेथून मुंबईच्या दिशेने लाँग मार्च काढणार असल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर २२ ऑक्टोबर रोजी अकोले येथे भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)च्या ज्येष्ठ नेत्या वृंदा करात, पॉलिट ब्युरो सदस्य डॉ. अशोक ढवळे, माजी आमदार जीवा पांडू गावित, आमदार विनोद निकोले आणि डॉ. अजित नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना दुष्काळी मदत, नियमित कर्जदारांना प्रोत्साहन अनुदान, नमो शेतकरी सन्मान योजनेचे थकीत हप्ते आणि पीक विम्याची नुकसानभरपाई तातडीने द्यावी, या प्रमुख मागण्या आंदोलनातून मांडण्यात आल्या आहेत. तसेच लाडकी बहीण योजनेच्या केवायसी प्रक्रियेतील अडचणींमुळे लाभापासून वंचित राहिलेल्या महिलांना पुन्हा योजनेत समाविष्ट करावे, केवायसी प्रक्रिया सुरू ठेवावी आणि पात्र महिलांचे थकीत हप्ते जमा करावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी विविध मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मंत्र्यांच्या समित्या नेमल्या जातात; मात्र निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे यावेळी आंदोलन थेट मुख्यमंत्री यांच्या शासकीय निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्यापर्यंत नेण्याचा निर्णय किसान सभेच्या राज्यस्तरीय बैठकीत घेण्यात आला आहे.

सरकारने मागण्यांची दखल घेऊन ठोस निर्णय घ्यावेत, अन्यथा अकोले ते मुंबई लाँग मार्चमध्ये राज्यभरातील शेतकरी, कामगार आणि महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. अशोक ढवळे, माजी आमदार जीवा पांडू गावित, आमदार विनोद निकोले, डॉ. अजित नवले आणि अन्य आंदोलनकर्त्यांनी केले आहे.

महामुक्काम सत्याग्रह यशस्वी करण्यासाठी सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, ज्ञानेश्वर काकड, ताराचंद विघे, मथुराबाई बर्डे, शिवराम लहामटे, राजू गंभीरे, गणेश ताजणे, एकनाथ मेंगाळ, संगीता साळवे, हेमलता शेळके आदी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

भाविकांवर काळाचा घाला

कार कालव्यात कोसळून तिघे ठार

युवावार्ता (प्रतिनिधी)



सोनई - येथे दर्शनासाठी आलेल्या सिन्नर तालुक्यातील कासारवाडी येथील भाविकांच्या कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट मुळा पाटबंधारे विभागाच्या कालव्यात कोसळली. या दुर्घटनेत तीन जण ठार झाले असून एक बचावला आहे.

घोडेगाव-सोनई रस्त्यावरील शनेश्वर दूध संघाजवळ असलेल्या कालव्यांच्या पुलावर बुधवारी सायंकाळी ही भीषण दुर्घटना घडली. कालव्यात पाणी सुरू असल्याने कारमधील तिघांचा मृत्यू झाला, तर एकजण सुदैवाने बचावला. कार (एमएच ०३ बीडब्लू ७८८४) मढी येथे दर्शनासाठी जात असताना, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे कार पुलावरून थेट कालव्यात कोसळली. या दुर्घटनेत रणधीर भाऊसाहेब, केरू जगताप आणि सुभाष बिडवे यांचा मृत्यू झाला. तर संदीप सदाशिव कदम हा या अपघातातून बचावला.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत, मदतकार्य सुरू केले. सोनई पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव, सहायक फौजदार मच्छिंद्र आडकित्ते, पो. कॉ सुनील पालवे, वजीर शेख यांच्यासह र्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. क्रेनच्या साहाय्याने कालव्यातील कार बाहेर काढण्यात आली. मृत व्यक्तींचे मृतदेह शवविच्छेदनासाठी नेवासा येथे पाठविण्यात आले होते.

नाशिकमध्ये 'डिजिटल अरेस्ट'चा धक्कादायक प्रकार !

दहशतवादी प्रकरणात अडकवण्याची धमकी देत ७१ लाखांची फसवणूक



युवावार्ता(प्रतिनिधी)

नाशिक- काश्मीरमधील दहशतवादी प्रकरणाशी संबंध असल्याचा आरोप करत अटक आणि मालमत्ता जप्तीची भीती दाखवून सायबर भामट्यांनी नाशिकमधील एका व्यक्तीला तब्बल ७१ लाख रुपयांचा गंडा घातल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आधारकार्डचा गैरवापर करून बँक खाते उघडल्याचे आणि त्यातून कोट्यवधी रुपयांचे मनी लॉन्ड्रिंग झाल्याचे सांगत संशयितांनी फिर्यादी यांच्यावर मानसिक दबाव निर्माण केला. या प्रकरणी नाशिक शहर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दहशतवादी प्रकरणात अडकवण्याची भीती

तक्रारीनुसार, २८ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सायबर भामट्यांनी मोबाईल फोन आणि इंटरनेटच्या माध्यमातून फिर्यादी यांच्याशी संपर्क साधला. काश्मीरमधील 'जेके ९५२७' या कथित प्रकरणात दोन दहशतवाद्यांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडे फिर्यादी यांचे आधारकार्ड सापडल्याचा दावा संशयितांनी केला. तसेच, या आधारकार्डचा वापर करून एचडीएफसी बँकेत फिर्यादी यांच्या नावाने खाते उघडण्यात आले असून, त्यातून तब्बल ७० कोटी रुपयांचे मनी लॉन्ड्रिंग झाल्याचे सांगण्यात आले. या कथित प्रकरणात अटक होऊ शकते आणि मालमत्ताही जप्त केली जाऊ शकते, अशी भीती दाखवून फिर्यादी यांना घाबरवण्यात आले.

गंभीर गुन्ह्यात अडकण्याची भीती निर्माण झाल्यानंतर फिर्यादी यांच्यावर मानसिक दबाव वाढवण्यात आला. त्यानंतर आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याच्या बहाण्याने संशयितांनी त्यांना वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास सांगितले. तक्रारीनुसार, या प्रकारातून फिर्यादी यांच्याकडून एकूण ७१ लाख रुपये विविध बँक खात्यांमध्ये जमा करून घेण्यात आले. संशयितांनी संपर्कासाठी व्हॉट्सप आणि सिग्नल या मेसेजिंग प्सचा वापर केल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

या फसवणुकीप्रकरणी नाशिक शहर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुशीला कोल्हे या प्रकरणाचा तपास करत आहेत. या प्रकरणातील संशयितांचा शोध आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी तपासातून स्पष्ट होणार आहे.

राष्ट्रवादीत मंत्रिमंडळ बदलाच्या जोरदार हालचाली

मुंबई (वृत्तसंस्था)



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मंत्रिमंडळ बदलाच्या हालचालींची चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत काल (बुधवारी, ता २१) दिल्लीत बैठक पार पडली, राज्यातील राष्ट्रवादीच्या वाट्याचे अर्थखात मिळण्यासोबतच मंत्रिपदे बदलण्याची देखील राष्ट्रवादीच्या प्रमुखांकडून अमित शाहांकडे इच्छा व्यक्त केल्याची सूत्रांची माहिती आहे. तीन दिवसांपूर्वी अमित शाह यांची पार्थ पवार आणि सुनेत्रा पवार यांनी भेट घेतल्यानंतर (छउझ - क्षळीं झरुरी) त्यानंतर लगेचच राज्याचे प्रमुख देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत अमित शाहांकडे बैठक पार पडली. अमित शाह यांच्या बैठकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात घडणाऱ्या घडामोडींकडे विशेष लक्ष लागलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीमध्ये अमित शाह यांची भेट घेतली. बुधवारी या नेत्यांमध्ये बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादीच्या वाट्याला सुरूवातीला आलेलं अर्थ खातं मिळण्यासोबतच मंत्रिपद बदलण्याची देखील राष्ट्रवादीच्या प्रमुखांकडून अमित शहांकडे इच्छा व्यक्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांच्या हवाल्याने समोर आली आहे. तीन दिवसांपूर्वी पार्थ पवार, सुनेत्रा पवार यांनी अमित शाह यांची भेट घेतल्यानंतर लगेचच देवेंद्र फडणवीस यांची आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांची अमित शाहांसोबत पुन्हा बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे, अमित शहा यांच्या बैठकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घडणाऱ्या घडामोडींकडे राज्याचं लक्ष लागलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत बदलाचे वारे वाहू लागल्याची माहिती एबीपी माझाला विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे, तीन दिवसांपूर्वी राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार आणि खासदार पार्थ पवार यांची अमित शाहांसोबत महत्त्वाची बैठक पार पडली होती, राज्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आलेलं अर्थखातं आहे ते पुन्हा मिळालं पाहिजे, मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आणखी काही फेरबदलांचाही निर्णय या बैठकीत चर्चेत आल्याची माहिती आहे. या अनुषंगाने महत्त्वाची चर्चा गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत झाल्याची माहिती एबीपी माझाला विश्वासनीय सूत्रांनी दिली आहे.

बुधवारी देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची गृहमंत्री अमित शाहांच्यासोबत एक बैठक पार पडली आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

चणेगाव सोसायटीच्या चेअरमनपदी प्रा. खेमनर, व्हा. चेअरमनपदी ढमक



युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - संगमनेर तालुक्यातील चणेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी ना. राधाकृष्ण विखे पाटील समर्थक प्रा. गणेश खेमनर यांची, तर व्हाईस चेअरमनपदी नारायण ढमक यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्वच स्तरांतून कौतुक होत आहे.

शैक्षणिक क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत असलेल्या प्रा. गणेश खेमनर यांच्यावर आता सहकार क्षेत्रातील महत्त्वाची धुरा सोपविण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे गावातील सहकार चळवळीला व संस्थेच्या कारभाराला नवी दिशा मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांमधून व्यक्त केला जात आहे. शेतकरी, सभासद आणि ग्रामस्थांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन सोसायटीच्या माध्यमातून विविध शेतकरीभिमुख व विकासात्मक उपक्रम राबविणार आहे, अशी ग्वाही नवनिर्वाचित चेअरमन प्रा. खेमनर यांनी यावेळी दिली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जोशी यांनी कामकाज पाहिले. त्यांना जिल्हा बँकेचे शाखाधिकारी दिलीप लावरे व सोसायटीचे सचिव संदीप उनवणे यांनी सहकार्य केले. याप्रसंगी प्रवरा सहकारी बँकेचे संचालक बाजीराव खेमनर पाटील, विखे पाटील कारखान्याचे संचालक भास्कर पाटोळ, विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक साहेबराव गुळवे, हौशाबापू पाटोळे, ज्ञानदेव खेमनर, सुभाष पाटोळे, सुभाष पावडे, भाऊसाहेब गुळवे, शंकर खेमनर, संतोष पावडे, रामभाऊ पाटोळे, मीखाईल लोहाळे, रामनाथ ढमक, दीपक घोगरे, पै. पोपट खेमनर, चंद्रभान सिनारे, पोपट खेमनर, बाबासाहेब पाटोळे यांच्यासह संस्थेचे संचालक, सभासद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित चेअरमन व व्हाईस चेअरमन यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

लहित खुर्द परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ

१६ विद्युत मोटारी फोडल्या!

लहित खुर्द - अकोले तालुक्यातील लहित खुर्द परिसरात चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारींना लक्ष्य करत तब्बल १६ मोटारी फोडल्याची घटना समोर आली आहे. मोटारींमधील तांब्याच्या तारेची चोरी करण्याच्या उद्देशाने हा प्रकार घडल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतीसाठी पाण्याची व्यवस्था करण्यासाठी लाखो रुपये खर्च करणाऱ्या शेतकऱ्यांवर या प्रकारामुळे आर्थिक संकट ओढवले असून परिसरातील शेतकरी हवालदिल झाले आहेत.

शेतीला पाणी देण्यासाठी अनेक शेतकरी नदीतून थेट पाइपलाइनद्वारे आपल्या शेतापर्यंत पाणी आणतात. यासाठी नदीकाठी विद्युत मोटारी बसविल्या जातात. मात्र, या मोटारी चोरट्यांच्या निशाण्यावर आल्या आहेत. काही ठिकाणी मोटारींची चोरी केली जाते, तर काही ठिकाणी मोटारी फोडून त्यातील मौल्यवान तांब्याची तार काढून नेली जाते. लहित खुर्द परिसरात १६ मोटारी फोडल्याच्या प्रकारामुळे या समस्येची तीव्रता पुन्हा एकदा समोर आली आहे.

मोटारींच्या नुकसानीमुळे शेतीचे पाणी धोक्यात

शेतकऱ्यांसाठी विद्युत मोटार ही केवळ यंत्रसामग्री नसून पिकांना वेळेवर पाणी देण्याचे महत्त्वाचे साधन आहे. मोटारी फोडल्या गेल्याने त्यांची दुरुस्ती किंवा नवीन मोटार खरेदी करण्याचा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांना सहन करावा लागतो. त्यातच मोटारी बंद पडल्याने पिकांना पाणी देण्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. आधीच शेतीचा वाढता खर्च आणि अनिश्चित परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना या चोरीच्या घटनांचा मोठा फटका बसत आहे. शेतातील विद्युत मोटारींच्या चोरीचे आणि मोटारी फोडून तांब्याची तार चोरण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. याबाबत पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल करूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. त्यामुळे चोरट्यांचे धाडस वाढत असून शेतकऱ्यांच्या मालमत्तेच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

लहित खुर्द परिसरातील १६ विद्युत मोटारी फोडल्याच्या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन पोलिसांनी तपास करावा, चोरट्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि शेतकऱ्यांचे होणारे नुकसान थांबवावे, अशी मागणी होत आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून शेतातील विद्युत मोटारींच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

'सह्याद्री मोटर वर्क्स'मुळे अकोल्याच्या वैभवात भर- ना. झिरवाळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले -शहर व तालुक्याच्या वैभवात भर घालणाऱ्या सह्याद्री मोटर्स वर्क्स या अद्ययावत चारचाकी वाहनांच्या शोरूमचे उद्घाटन राज्याचे अन्न व औषध प्रशासन तथा विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते झाले. या शोरूमच्या माध्यमातून अकोलेकरांना आधुनिक वाहनविषयक सुविधा उपलब्ध होणार असून, भविष्यात या व्यवसायाने मोठी भरारी घ्यावी, अशी अपेक्षा मंत्री झिरवाळ यांनी व्यक्त केली.



अकोले येथील शेकईवाडी परिसरात इंजि. शशांक शिवाजी बिबवे यांच्या सह्याद्री मोटर्स वर्क्सच्या उद्घाटनप्रसंगी शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे अध्यक्षस्थानी होते. समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांनीही कार्यक्रमाला सदिच्छा भेट दिली. या सोहळ्यानिमित्त विविध राजकीय पक्षांचे नेते, आजी-माजी आमदार आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर एकाच व्यासपीठावर उपस्थित होते.

मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सर्वांना संकटातून सावरण्याचे बळ मिळावे, अशी अगस्ती महाराजांच्या चरणी प्रार्थना केली. तसेच शशांक बिबवे यांना नवीन व्यवसायाच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय भाषणात खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी अकोलेतील शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. औद्योगिक क्षेत्रात सातत्याने बदल होत असून, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे २०३० पर्यंत जगात मोठे परिवर्तन घडेल, असे त्यांनी नमूद केले. बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत अकोलेसारख्या आदिवासी भागात आधुनिक शोरूम सुरू होणे ही आमदार अमोल खताळ यांनी पुणे, मुंबई आणि नाशिकसारख्या मोठ्या शहरांत उपलब्ध असलेल्या सुविधा आता अकोलेतही मिळू लागल्या असल्याचे सांगितले. अकोले तालुका प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असून, बिबवे परिवाराने सुरू केलेल्या या व्यवसायामुळे स्थानिकांना आधुनिक सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी विविध व्यवसायांमुळे अकोले शहराचा चेहरामोहरा बदलत असल्याचे सांगत महत्त्वाची बाब असल्याचे सांगत त्यांनी बिबवे परिवाराचे अभिनंदन केले. कोणताही व्यवसाय यशस्वी करण्यासाठी सचोटी आणि प्रामाणिकपणा आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. माजी आमदार वैभवराव पिचड यांनी तालुक्यात जलसंधारणाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या समृद्धीचा उल्लेख केला. ग्रामीण भागातील युवक व्यापार आणि व्यवसायात पुढे येत असल्याचे सांगत, सह्याद्री मोटर्स वर्क्समुळे अकोलेतील वाहनधारकांना मोठी सुविधा मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

बिबवे परिवाराला शुभेच्छा दिल्या. आमदार डॉ. किरण लहामटे, योगी केशव बाबा चौधरी, ज्येष्ठ नेते जे. डी. आंबरे, मधुकरराव नवले, कॉ. कारभारी उगले आणि डॉ. जालिंदर भोर यांनीही मनोगत व्यक्त करून नवीन व्यवसायाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पत्रकार अमोल वैद्य यांनी केले. सूत्रसंचालन ह.भ.प. दीपक महाराज देशमुख आणि प्रकाश आरोटे यांनी केले, तर आभार नगरसेविका शीतल बिबवे-वैद्य यांनी मानले. बिबवे परिवाराच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

नवरात्रोत्सवातील रक्तदान संकल्प पुर्तता

अकोलेकरांचा समाजसेवेचा आदर्श



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळ, अकोले, अकोले मेडिकल फाउंडेशन, अकोले आणि अर्पण ब्लड बँक, संगमनेर-अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून मंडळाच्या तरुण कार्यकर्त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान करून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला.

नवरात्रोत्सवाच्या उत्साहात गरबा आणि दांडियासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक दायित्वाची जाणीव ठेवून मंडळाच्या कार्यकर्त्यांनी रक्तदानासाठी पुढाकार घेतला. रक्तदान हे श्रेष्ठ दान असून, गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. उत्सव साजरा करतानाच समाजोपयोगी कार्य करण्याचा मंडळाचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

या वेळी मंडळाचे सदस्य डॉ. मुकुंदा भोर, अक्षय नाईकवाडी, अमित नाईकवाडी, पराग वाडगे, निलेश नाईकवाडी, अभिजीत नाईकवाडी, पृथ्वीराज कुडेकर, प्रवीण वैद्य, उमेश संपत नाईकवाडी, अमन शेख, सुशांत कुटे, नितीश वाकचौरे, डॉ. प्रकाश वाकचौरे, गणेश झोडगे, सुजाता वाघमारे, श्रद्धा जोगदंड आणि प्रवीण कोरडे आदी उपस्थित होते. या सामाजिक उपक्रमासाठी राजेंद्र शेठ भळगट यांनी विशेष सहकार्य केले. रक्तदानातून माणुसकीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमामुळे नवरात्रोत्सवाला सामाजिक सेवेची जोड मिळाली. उत्सव आनंदाचा, संकल्प समाजसेवेचा आणि ध्यास रक्तदानातून जीवन वाचवण्याचा! हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

टंचाई उपाय योजनात अहिल्यानगर जिल्ह्याचा प्रभावी पॅटर्न

टंचाई निवारणासाठी जिल्हा प्रशासनाबरोबर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निर्देशानुसार तालुकानिहाय टंचाई आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकांमध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये चारा, पाणी उपलब्धता, टँकरची आवश्यकता, पशुधनाची गणना व या अनुषंगाने भविष्यकालीन नियोजनाबाबतही संबंधित विभागांशी प्रत्यक्ष चर्चा करून नियोजन करण्यात आले. यामध्ये अहिल्यानगर, नेवासा, श्रीरामपूर, राहता, कोपरगाव, अकोले, संगमनेर, राहुरी, श्रीगोंदा, पाथर्डी, कर्जत, शेवगाव, जामखेड, पारनेर या सर्व तालुक्यांचा आढावा प्रत्यक्ष तालुक्यात जाऊन पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतला.

अहिल्यानगर जिल्ह्यात खरीप हंगामातील पिकांचे झालेले नुकसान आणि पिण्याच्या पाण्यासह पशुधनाच्या चाऱ्याचा निर्माण झालेला प्रश्न या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीत जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तालुकानिहाय आढावा बैठकां घेवून सर्व यंत्रणांना नियोजन करण्यावर भर देण्यास सुचित केले.प्रशासन आणि शासन यांच्यामधील समन्वय, संवाद आणि प्रत्यक्ष कार्यवाही यातून जनतेला दिलासा देण्याची प्रकिया गतिमान झाली आहे. केवळ तातडीच्या टंचाई निवारणापुरते मर्यादित न राहता दीर्घकालीन उपाययोजनांवर भर देण्याच्या त्यांच्या आग्रही भूमिकेमुळे संपूर्ण जिल्हा प्रशासन सध्या पूर्णपणे 'क्शन मोड'वर आहे.



पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य

दुष्काळाच्या काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सर्वाधिक संवेदनशील असतो. त्यामुळे धरणातील उपलब्ध जलसाठा हा मुख्यत्वे पिण्याच्या पाण्यासाठीच राखून ठेवण्यावर शासनाने भर दिला आहे. त्याप्रमाणे जिल्ह्यातील उपलब्ध पाणीसाठ्याचे ऑगस्ट २०२७ पर्यंत राखीव ठेवण्यात आले आहे.

उद्भवाच्या ठिकाणी 'फिल्टर प्लांट'

टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना पाण्याचा दर्जा चांगला राहावा आणि ग्रामस्थांना शुद्ध पाणी मिळावे, यासाठी पाण्याच्या उद्भवाच्या ठिकाणी 'फिल्टर प्लांट' बसविण्याचा राज्यातील पहिला नावीन्यपूर्ण प्रयोग अहिल्यानगर जिल्ह्यात राबवला जाणार आहे. यासाठी आवश्यक निधी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून उपलब्ध करून देण्याची ग्वाही पालकमंत्र्यांनी दिली आहे.

जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधीर बोराळे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ.उमेश पाटील यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, तहसीलदार, कृषी आणि पशुसंवर्धन विभागाची यंत्रणा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पाणीपुरवठा विभाग, जलसंपदा विभाग, महावितरण या सर्व विभागाने क्षेत्रभेटी देऊन तालुका निहाय टंचाईवर उपाययोजना करण्याचे नियोजन करण्याबाबत दक्षता घेतली आहे. वेळोवेळी नागरिकांनी केलेल्या सूचनावर कार्यवाही करण्याचे निर्देश तालुका निहाय बैठकीत देण्यात आलेले आहेत यामध्ये सरपंच, शेतकरी, दुग्ध व्यवसाय करणारे व्यावसायिक यांच्याही सूचनांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

पारनेर, अकोले आणि इतर तालुक्यांतील ८० ते ९० टक्के पूर्ण झालेल्या नळपाणी पुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बंद पडलेल्या योजनांची दुरुस्ती करून जलस्रोतांची क्षमता तपासण्याचे काम वेगाने सुरू आहे. तसेच पारनेर शहर व परिसरासाठी सुपा एमआयडीसीतून पाणी उपलब्ध करण्याबाबतही चाचपणी सुरू आहे. पाणी असणाऱ्या जलस्रोतांचे बळकटीकरण, दुरुस्ती, साफसफाई, करण्यात आली आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे असल्याकारणाने त्यांनी जिल्ह्यातील तसेच राज्यातील विविध धरणाची क्षमता बांधणी करून पाणी साठवण क्षमता वाढीसाठी विविध कामांना मंजुरी दिलेली आहे. तसेच यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सेवा संकल्प अभियानांतर्गत जलसेवा उपक्रमात निळवंडे ,भंडारदरा, प्रवरा डावा कालवा, या धरणांचे व कालव्याचे पाणी क्षमता वाढीसाठी निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

चारा टंचाईवर मात करण्यासाठी 'हायड्रोपोनिक्स'चा अवलंब

अहिल्यानगर जिल्ह्याची ग्रामीण अर्थव्यवस्था आणि दुग्ध व्यवसाय पूर्णपणे पशुधनावर अवलंबून आहे. पावसाअभावी चाऱ्याचे उत्पादन घटल्याने पशुपालक अडचणीत येऊ नयेत यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या नियोजनामुळे आणि पशुगणना झाली असल्याने चाऱ्यांच्या उपलब्धता , भविष्यातील गरज पाहता नियोजन करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांकडे वैयक्तिक चारा पिकवण्यासाठी पाणी उपलब्ध आहे त्यांच्याकडे गाळपेरा आणि चारा बियाणे उपलब्ध करून देऊन चारा उत्पादन घेण्याबाबतही नियोजन कृषी आणि पशुसंवर्धन विभागाने केलेले असल्याने भविष्यातील नियोजनात याची नक्कीच मदत होणार आहे. प्रत्यक्ष शेतकऱ्यांना चारा खरेदीसाठी महाडीबीटीवर अनुदान उपलब्ध करून देण्या बाबतची ही मागणी शासनाकडे मांडणार असल्याचे त्यांनीही विविध बैठकात सांगितले. कमी जागेत आणि अत्यंत कमी पाण्यात पौष्टिक चारा तयार करण्यासाठी 'हायड्रोपोनिक्स' (कूर्णीपिळली) या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर जिल्ह्यात सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तालुक्यातील एकूण पशुधन, चाऱ्याची प्रत्यक्ष गरज आणि शासनाने बियाणे दिल्यास चारा पिकांचे उत्पादन घेण्यास उत्सुक असलेले शेतकरी यांचा वस्तुनिष्ठ माहिती संकलित करण्याचे काम गावपातळीवर सुरू आहे.

खरिपाच्या पिकांचे पावसाअभावी नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना योग्य भरपाई मिळण्यासाठी पीक नुकसानीचे पंचनामे अत्यंत पारदर्शकतेने आणि गतीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले गेले. केंद्र शासनाच्या विशेष पथकाने ९ ऑक्टोबर रोजी जिल्ह्याचा दौरा करून दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली आहे. यामुळे केंद्राकडून मिळणाऱ्या मदतीचा मार्ग अधिक सुकर झाला आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकारामुळे पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, महसूल आणि पशुसंवर्धन या सर्वच यंत्रणांमध्ये उत्तम समन्वय झाला आहे. टंचाईग्रस्त गावांची संख्या, विहिरींची स्थिती, टँकरची गरज आणि शेतीच्या नुकसानीचा वस्तुनिष्ठ आढावा प्रशासनाकडे उपलब्ध आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासमोरील टंचाई आढावा बैठकीमुळे प्रशासन संवेदनशीलतेने आणि तत्परतेने काम करीत आहे. उपाययोजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी ही ग्रामीण भागातील जनतेला आणि बळीराजाला दिलासा मिळणार आहे.

डॉ. मीरा ढास, माहिती अधिकारी,
उप माहिती कार्यालय शिर्डी.

संपादकीय...

सायबर फसवणुकीचे वाढते जाळे; डिजिटल साक्षरता काळाची गरज

आजचे युग डिजिटल क्रांतीचे आहे. मोबाईल फोन, इंटरनेट, ऑनलाइन बँकिंग, यूपीआय, डिजिटल पेमेंट आणि विविध सरकारी ऑनलाइन सेवांमुळे सामान्य माणसाचे जीवन अधिक सोपे झाले आहे. पूर्वी बँकेत जाऊन करावी लागणारी अनेक कामे आता घरबसल्या काही मिनिटांत पूर्ण होतात. पैशांची देवाणघेवाण, वस्तूंची खरेदी, वीजबिल भरणे, रेल्वे तिकीट आरक्षित करणे अशा अनेक गोष्टींसाठी डिजिटल माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. मात्र, तंत्रज्ञानाने सुविधा उपलब्ध करून दिल्या असल्या, तरी त्याच तंत्रज्ञानाचा गैरवापर करून नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या सायबर भामट्यांचे जाळेही दिवसेंदिवस विस्तारत आहे. त्यामुळे डिजिटल व्यवहारांबरोबरच डिजिटल साक्षरता आणि सायबर सुरक्षेची जाणीव निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. सायबर गुन्हेगारांची फसवणुकीची पद्धत आता अधिक आधुनिक आणि क्लिष्ट झाली आहे. पूर्वी अनोळखी व्यक्तींकडून येणारे संशयास्पद फोन किंवा संदेश यांपुरती फसवणूक मर्यादित होती. आता मात्र बँकेचे अधिकारी, पोलीस, सरकारी तपास यंत्रणांचे प्रतिनिधी, कुरिअर कर्मचारी किंवा नामांकित कंपन्यांचे कर्मचारी असल्याचे भासवून नागरिकांना जाळ्यात ओढले जाते. बँक खाते बंद होणार आहे, आधारकार्डचा गैरवापर झाला आहे, तुमच्या नावावर बेकायदेशीर व्यवहार झाले आहेत, असे सांगून घाबरवले जाते. काही प्रकरणांत अटक करण्याची किंवा मालमत्ता जप्त करण्याची धमकी देऊन लाखो रुपयांची मागणी केली जाते. अशा प्रकारच्या फसवणुकीला 'डिजिटल अरेस्ट'सारख्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सायबर गुन्ह्यांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रत्यक्षात फोन किंवा व्हिडिओ कॉलवरून एखाद्या व्यक्तीला अटक करून ठेवण्याचा अधिकार अशा प्रकारे वापरता येत नाही; तरीही कायद्याचे अपुरे ज्ञान आणि भीती यांचा फायदा घेत नागरिकांना आर्थिक संकटात ढकलले जाते. नाशिकमध्ये काश्मीरमधील कथित दहशतवादी प्रकरणाशी संबंध असल्याची भीती दाखवून एका व्यक्तीची ७१ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना या धोक्याची गंभीरता अधोरेखित करते. आधारकार्डचा वापर करून बँक खाते उघडण्यात आले असून त्यातून कोट्यवधी रुपयांचे मनी लॉन्ड्रिंग झाल्याचा दावा करत संबंधित व्यक्तीवर मानसिक दबाव आणण्यात आला. चौकशीच्या नावाखाली विविध बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास भाग पाडल्याचे तक्रारीत नमूद आहे. ही घटना केवळ एका व्यक्तीच्या आर्थिक नुकसानीची बाब नाही, तर सायबर गुन्हेगार नागरिकांच्या मनातील भीती, प्रतिष्ठेची चिंता आणि कायदेशीर अडचणीत सापडण्याच्या धास्तीचा कसा गैरफायदा घेतात, याचे उदाहरण आहे. अशा घटनांमधून प्रत्येकाने सावध होण्याची गरज स्पष्ट होते. सायबर फसवणुकीच्या इतर प्रकारांमध्ये बनावट गुंतवणूक योजना, ऑनलाइन नोकरीचे आमिष, लॉटरी लागल्याचे संदेश, बनावट लिंक, सोशल मीडियावरील खोटी खाती आणि ओटीपी मिळवून बँक खात्यातील पैसे काढणे यांचा समावेश होतो. कमी वेळेत मोठा नफा मिळवून देण्याचे आश्वासन दिले जाते. सुरुवातीला थोडी रक्कम परत देऊन विश्वास संपादन केला जातो आणि नंतर मोठी गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले जाते. काही वेळा अनोळखी व्यक्तीकडून पाठवलेली लिंक उघडल्याने किंवा बनावट प डाउनलोड केल्याने वैयक्तिक माहिती आणि आर्थिक व्यवहारांशी संबंधित तपशील धोक्यात येऊ शकतात. विशेष म्हणजे, सायबर भामटे केवळ तंत्रज्ञानाचा वापर करत नाहीत, तर माणसाच्या भावनांनाही लक्ष्य करतात. भीती, लोभ, घाई आणि विश्वास या चार गोष्टींचा वापर करून फसवणुकीचे जाळे विणले जाते. या पार्श्वभूमीवर डिजिटल साक्षरतेचा अर्थ केवळ मोबाईल वापरता येणे किंवा ऑनलाइन पैसे पाठवता येणे एवढाच मर्यादित ठेवता कामा नये. कोणती माहिती सुरक्षित ठेवावी, अनोळखी संदेशांची सत्यता कशी तपासावी, बनावट वेबसाइट आणि अधिकृत वेबसाइट यांतील फरक कसा ओळखावा, डिजिटल व्यवहार करताना कोणती काळजी घ्यावी, याचे ज्ञान प्रत्येक नागरिकाला असणे आवश्यक आहे. बँक खाते क्रमांक, पासवर्ड, एटीएम पिन, ओटीपी आणि संवेदनशील वैयक्तिक माहिती कोणाशीही शेअर करू नये. पैसे मिळवण्यासाठी यूपीआय पिन टाकण्याची गरज नसते, हेही लक्षात ठेवले पाहिजे. अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून स्क्रीन शेअरिंग प डाउनलोड करणे किंवा फोनचा रिमोट क्सेस देणे टाळले पाहिजे. कोणताही अधिकारी फोनवरून पैसे विशिष्ट खात्यात हस्तांतरित करण्यास सांगत असेल, तर त्यावर विश्वास ठेवण्याऐवजी संबंधित विभागाशी अधिकृत संपर्क माध्यमातून खातरजमा करणे गरजेचे आहे. सायबर सुरक्षेची जबाबदारी केवळ नागरिकांवर टाकून चालणार नाही. बँका, पोलीस यंत्रणा, शैक्षणिक संस्था, सरकारी विभाग आणि डिजिटल सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांनीही जनजागृतीसाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. शाळा-महाविद्यालयांमध्ये डिजिटल सुरक्षिततेचे प्रशिक्षण दिले पाहिजे..

डॉ. सौरभ पगडाल यांच्या वाढदिवसानिमित्त तळेगाव योगदान वाचनालयास पुस्तके भेट

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर - समृद्ध वाचनामुळेच तरुण पिढी व समाज घडेल. ग्रामीण भागातील माणसाने पोथ्या,पुराण वाचनापेक्षा छत्रपती शिवराय यांचे चरित्र, महात्मा फुले-सावित्री, राजर्षी शाहू, अण्णाभाऊ साठे यांचे कार्य समजून घ्यावे, बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधानाचे पारायण करावे,शास्त्रज्ञांचे चरित्र, समाज सुधारकांचा इतिहास समजून घ्यावा. संत नामदेव, तुकाराम, एकनाथ, ज्ञानेश्वर या संतांची परंपरा समजून घ्यावी. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करत बुरसटलेल्या रूढी परंपरातून बाहेर येऊन अंधश्रद्धा दूर कराव्यात. हे काम ग्रामीण भागातील वाचनालये यांनी पूर्ण करावे असा विचार सामाजिक कार्यकर्ते हिरालाल पगडाल यांनी मांडले.

संगमनेर मधील प्रथितयश ऑर्थोपेडिक डॉक्टर सौरभ श्रीनिवास पगडाल यांच्या वाढदिवसानिमित्त पगडाल परिवाराने दहा हजाराची वाचनीय दर्जेदार पुस्तके योगदान वाचनालयास भेट दिली.

यावेळी वाचनालयाचे संचालक डॉक्टर संदीप गोर्डे यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील या वाचन चळवळीमुळे आदर्शगाव वडझरी बुद्रुक येथील सामाजिक कामात तरुणांच्या सहकार्य घेत चांगले काम करू शकलो. सुनिता पगडाल यांनी सांगितलं की, मराठी माध्यमाच्या शाळेत शिकणारा सौरभ अर्थपीडीक डॉक्टर म्हणून लिगामेंट, खुबा यांच्या अत्यंत गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियाही यशस्वी करत दाखवत उत्तम सेवा देत आहे. दरवर्षी वाढदिवसाच्या निमित्ताने डॉक्टर सामाजिक बांधिलकी ठेवत गरजू विद्यार्थी, शाळा, वाचनालय यांना मदत करत आहेत. यावेळी योगदान वाचनालयाचे सहसचिव डॉक्टर सोमनाथ जोंधळे, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब गुंजाळ, श्रीनिवास पगडाल, सुनील जगताप, गणेश जोर्वेकर, विजय दिघे, ग्रंथपाल नामदेव पिंगळे, सेवक शाम दिघे आदी उपस्थित होते.

राज्यातील शाळांना दिवाळी सुट्टी २ नोव्हेंबरपासून

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी दिवाळीच्या सुट्ट्यांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार, २ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत दिवाळीची सुट्टी असणार आहे. त्यानंतर १६ नोव्हेंबरपासून शाळा पुन्हा सुरू होऊन दुसऱ्या शैक्षणिक सत्राला सुरुवात होणार आहे.

माध्यमिक शाळा संहितेनुसार, चालू शैक्षणिक वर्षातील पहिले सत्र १५ जून २०२६ रोजी सुरू झाले असून, ते ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी संपणार आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुट्ट्या मिळणार आहेत. या सुट्टीच्या कालावधीत धनत्रयोदशी, दिवाळी पाडवा, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज यांसारख्या सणांचा समावेश आहे. शैक्षणिक वर्षातील दुसरे सत्र संपल्यानंतर विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी मिळणार आहे. ही सुट्टी ३ मे २०२७ ते १४ जून २०२७ या कालावधीत असणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी सुमारे ४३ दिवस मिळतील.

माध्यमिक शाळा संहितेनुसार, संपूर्ण शैक्षणिक वर्षातील सर्व प्रकारच्या सुट्ट्यांची एकूण संख्या ७६ दिवसांपेक्षा अधिक होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश शाळांना देण्यात आले आहेत. त्यामुळे शाळांनी जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार शैक्षणिक नियोजन करणे अपेक्षित आहे.

मालपाणी विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

राष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदकाची कमाई; आराध्य गुंजाळची भारतीय संघात निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर- जालंधर (पंजाब) येथे १७ ते २१ ऑक्टोबरदरम्यान आयोजित सब-ज्युनिअर (१४ वर्षांखालील) राष्ट्रीय रिंग टेनिक्वाइट स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावत कांस्यपदक मिळविले. या संघाचे नेतृत्व संगमनेर येथील मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयाचा विद्यार्थी आराध्य रोहिदास गुंजाळ याने केले. सिंगल्स आणि डबल्स प्रकारांतील त्याच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत त्याची भारतीय संघात निवड करण्यात आली आहे. आराध्यची ही निवड मालपाणी विद्यालयासह संपूर्ण संगमनेर तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

फेडरेशन ऑफ इंडिया रिंग टेनिस संघटनेच्या वतीने आयोजित या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने हिमाचल प्रदेश, दिल्ली, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, जम्मू-काश्मीर, पश्चिम बंगाल आणि ओडिशा या राज्यांच्या संघांविरुद्ध सामने खेळले. उपांत्य फेरीत तामिळनाडूविरुद्ध झालेल्या अटीतटीच्या लढतीत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी दमदार खेळ केला. स्पर्धेतील एकूण कामगिरीच्या जोरावर संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

कर्णधार आराध्य गुंजाळ याने सिंगल्समध्ये प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज दिली, तर डबल्समध्ये प्रथमेश राठोड आणि शार्दुल विजय पवार यांच्या साथीने प्रभावी खेळ केला. महाराष्ट्राच्या मुलींच्या संघात मालपाणी विद्यालयाची विद्यार्थिनी आरती शेटे हिचाही समावेश होता. तिनेही उत्कृष्ट कामगिरी केली.

महाराष्ट्र संघातील खेळाडूंना राज्यसभेचे सदस्य पद्मश्री संत बलबीर सिंग सिचेवाल आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत कांस्यपदके व प्रशस्तिपत्रके प्रदान करण्यात आली. संघाला प्रशिक्षक आमोद भिडे (सांगली) आणि व्यवस्थापक शुभम शेटे (अहिल्यानगर) यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच अहिल्यानगर जिल्हा टेनिक्वाइट संघटनेचे सचिव बाबा गायकवाड, राजेंद्र थोरात, क्रीडा शिक्षिका तथा पर्यवेक्षिका रंजना पवार आणि सुप्रिया गुंजाळ यांचे सहकार्य मिळाले. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि संगमनेरमधील क्रीडाप्रेमींनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

मोदी सरकारची एक्सपायरी डेट संपली! - खा. संजय राऊत

मुंबई (वृत्तसंस्था)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची 'एक्सपायरी डेट' आता संपली असून, आगामी एप्रिल महिन्यापासून त्यांची घसरगुंडी सुरू होईल आणि मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत त्यांचे सरकार कोसळेल, असा अत्यंत मोठा आणि खळबळजनक दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

देशात सध्या वेगाने राजकीय वातावरण बदलत असल्याचा दावा करत संजय राऊत म्हणाले, माझ्या या दाव्याप्रमाणेच देशातील प्रमुख नेत्यांच्या विचारांची दिशा आता मला दिसत आहे. काल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही हीच भूमिका मांडली होती आणि आमचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेही हेच सांगत आहेत. दिल्लीमध्ये राहुल गांधी हेच बोलत आहेत आणि मी स्वतः हे वारंवार सांगतोय.देशातील बदलत्या राजकीय परिस्थितीचे उदाहरण देताना संजय राऊत यांनी अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या दौऱ्याचा दाखला दिला. ते म्हणाले, अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री भारतात आले, पण ते थेट मुंबईत आले. त्यांनी भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांनाही दिल्लीतून मुंबईत बोलावून घेतले. यापूर्वी एखादा डेप्युटी मिनिस्टर आला तरी तो दिल्लीत जाऊन मोदी आणि इतर नेत्यांना भेटत असे. मात्र, यावेळी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री दिल्लीला न जाता मुंबईत आले आणि त्यांनी मोदींची भेट घेतली नाही.

ग्रामपंचायत अळकुटी ब-१ निविदा नोटीस

प्रशासक /ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं.अळकुटी.ता पारनेर जि.अहिल्यानगर यांचे कडून खालील कामाचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा.बा.विभाग यांचे कडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून सीलबंद ब१ दोन लिफाफा पद्धतीने ब-१ निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्रं.	कामाचे नाव	योजना	निविदा विक्री	बयाणा रक्कम	निविदा रक्कम	कामाची मुदत	वर्गवारी
१	मौजे अळकुटी येथे श्री.संत रोहिदास नगर बंदिस्त गटार करणे.	अनुसूचित जाती व नवबौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करणे २०२५-२६	५९०/-	--	६७७६७२/-	६ महिने	सु.बे

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटीबाबत ची माहिती ग्रामपंचायत **अळकुटी.** कार्यालयात **दि.२२/१०/२०२६ ते दि. २९/१०/२०२६** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सीलबंद निविदा **दि. २९/१०/२०२६** पर्यंत रोजी संध्याकाळी ठीक ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटि शर्ती बाबत माहिती ग्रा. प. **अळकुटी.**. येथे उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याच्या अगर नाकारण्याचा अधिकार प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत **अळकुटी.**. यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि. ३०/१०/२०२६** रोजी सकाळी १०.०० वाजता ग्रामपंचायत **अळकुटी.**. ता पारनेर, जि-अ. नगर येथे पार पडेल निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जिएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब१ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टंप पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु.बे. साठी सुरुवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सूट राहील नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टंप पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबे साठी प्रमाणपत्रावर सूट चा उल्लेख असणे गरजेचे आहे) व निविदा फि भरलेची पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. अळकुटी, ता. पारनेर, जि. अ.नगर

प्रशासक
ग्रा.पं. अळकुटी, ता. पारनेर, जि. अ.नगर

ग्रामपंचायत सारोळा सोमवंशी... ब-१ निविदा नोटीस

प्रशासक /ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. सारोळा सोमवंशी. ता. श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर यांचे कडून खालील कामाचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा.बा.विभाग यांचे कडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून सीलबंद ब१ दोन लिफाफा पद्धतीने ब-१ निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्रं.	कामाचे नाव	योजना	निविदा रक्कम	निविदा फॉर्म फी	बयाणा रक्कम	ठेकेदार वर्गवारी	कामाची मुदत
१	मौजे सारोळा सोमवंशी येथे भैरवनाथ मंदिर पालखी मार्ग येथे रस्ता काँक्रीटीकरण करणे	जनसुविधा विशेष अनुदान योजना	७९१३७२/-	५९०/-	--	सु.बे. अ.	६ महिने
२	मौजे सारोळा सोमवंशी येथे ग्रा. पं. ऑफिस ते जि. प. शाळा भुमिगत गटार लाईन करणे.	जनसुविधा विशेष अनुदान योजना	८३३९४९/-	५९०/-	--	सु.बे. अ.	६ महिने

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटीबाबत ची माहिती ग्रामपंचायत **सारोळा सोमवंशी.** कार्यालयात **दि.२२/१०/२०२६ ते दि. २९/१०/२०२६** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सीलबंद निविदा **दि. २९/१०/२०२६** पर्यंत रोजी संध्याकाळी ठीक ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटि शर्ती बाबत माहिती ग्रा. प. **सारोळा सोमवंशी.** येथे उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याच्या अगर नाकारण्याचा अधिकार प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत **सारोळा सोमवंशी.** यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि. ३०/१०/२०२६** रोजी सकाळी १०.०० वाजता ग्रामपंचायत **सारोळा सोमवंशी.**ता श्रीगोंदा, जि-अ. नगर येथे पार पडेल निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जिएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब१ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टंप पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु.बे. साठी सुरुवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सूट राहील नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टंप पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबे साठी प्रमाणपत्रावर सूट चा उल्लेख असणे गरजेचे आहे) व निविदा फि भरलेची पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. सारोळा सोमवंशी, ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर

प्रशासक
ग्रा.पं. सारोळा सोमवंशी, ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
Fayyaz Ahmad Sohrab Ali
NEW NAME AS
Faiyaz Soharab Malik
Address:- Ghargaon Pune Nasik Road Gavthan 422620

कामगार भरती
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण - रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

पाहिजेत
मे.साईराज सेल्स कॉर्पोरेशन
Exide battery sales & services (Sangamner)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(टॅलीचे ज्ञान आवश्यक)
बॅटरी विषयी माहिती असलेला - 1जागा
संपर्क क्रमांक:
9822312490

पाहिजेत
ध्येय फायनान्स संगमनेर
Branch manager BM-1
Branch devlopment Menegar BDM- 1
Sales devlopment MenegarSDM - 1
Telicaller - 2 M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
9370773504
7768079272

भाड्याने देणे आहे
टॉप टेन इम्पेरिअल (रिलायन्स डिजीटल) मध्ये ग्राउंड फ्लोअरचे दोन शॉप किंवा ऑफिस भाड्याने देणे आहे
- संपर्क -
9730380303
9552690909

पाहिजेत
सेल्समन – २
फार्मासिस्ट – १
अनुभावास प्राधान्य
पलोड मेडिकल, संगमनेर नविन नगर रोड, ताजने मळा, सावंत हॉस्पिटल समोर
९९२२२९४००४

पाहिजेत
अकाऊंटंट - 2 जागा
कॅशिअर - 2 जागा
सेल्समन - १० जागा (पु.)
सेल्समन - १० जागा (म.)
वॉचमन - २ जागा
आकर्षक पगार दिले जाईल
मुळचंद होलसेल मिल डेपो
अकोले रोड, सेलिब्रेश हॉटेल समोर, संगमनेर
7498901766

पाहिजेत
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य)
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ ॲण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266

SR THORAT
पाहिजेत
मार्केटिंग वाहतूक गाड्यांची आवश्यक
आमच्या प्रतिदिन दूध .पॅकिंग व दुग्धजन्य पदार्थ करिता संगमनेर तालुका व आसपासच्या परिसरा मध्ये मार्केटिंग कामासाठी खालील प्रकारच्या इन्सुलेटेड गाड्यांची आवश्यकता आहे. साधारण ५०० किलो पर्यंत माल असेल

१.क्रं	गाडीचा प्रकार
१	छोटा हत्ती
२	टाटा झिप
३	महिंद्रा जीतो
४	मारुति सुजुकी सुपर कॅरि

सदर गाडी मालकांनी ऑफिस मध्ये गाडीच्या कागदपत्रासह समक्ष भेटणे. कंपनी कामकाज वेळेत रविवार सोडून. कामासंबधी सर्व अटी व शर्ती कंपनी नियमप्रमाणे राहतील. या संदर्भात आवश्यक ती माहिती कंपनी कार्यलयात मिळेल.
ऑफिस- एस.आर.थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा. लि. राजापूर रोड. संगमनेर
मो.९८६०१००९३६/९३७



पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

आधी पिंपळगाव खांडचे रोटेशन सोडा मगच वीज कनेक्शन बंद करा - जनतेची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

साकूर - एल-निनोच्या पार्श्वभूमीवर जलसाठ्याचे काटकसरीने नियोजन करण्यासाठी जलसंपदा विभागाने संगमनेर तालुक्यातील साकूर आणि मांडवे बुद्रुक येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांमधून उपसा सिंचन योजनांचे वीज कनेक्शन बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, या निर्णयाला नदीकाठच्या शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असून, पिंपळगाव खांड धरणाचे रोटेशन शिंदोडीपर्यंत सोडल्यानंतरच वीज कनेक्शन बंद करण्याचा विचार करावा, अशी मागणी केली आहे.

या प्रश्नावर बुधवारी (दि. २१ ऑक्टोबर) साकूर ग्रामपंचायत कार्यालयात शेतकऱ्यांची बैठक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शंकरराव खेमनर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. पिण्याच्या पाण्याच्या नियोजनाला विरोध नसला, तरी सिंचनासाठी पर्यायी पाणी उपलब्ध न करता वीज कनेक्शन बंद करणे अन्यायकारक असल्याची भूमिका शेतकऱ्यांनी मांडली.

साकूर आणि मांडवे बुद्रुक येथील काही बंधाऱ्यांमध्ये अत्यल्प पाणीसाठा शिल्लक असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. काही ठिकाणी उपलब्ध पाणी केवळ १० ते १५ दिवस पुरेल, तर काही बंधारे कोरडे पडल्याचा दावा त्यांनी केला. सध्या शेतांमध्ये जनावरांसाठी चारा पिके उभी असून, वीजपुरवठा बंद झाल्यास पिकांना पाणी देणे कठीण होईल. त्यामुळे चारा आणि पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. केवळ साकूर आणि मांडवे बुद्रुक येथील शेतकऱ्यांवरच कारवाई का केली जात आहे, असा प्रश्न उपस्थित करत नदीकाठच्या सर्व गावांसाठी समान निकष लागू करण्याची मागणीही करण्यात आली.

बैठकीदरम्यान सभापती शंकरराव खेमनर यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून शेतकऱ्यांची भूमिका मांडली. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन या प्रश्नावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. माजी सरपंच भाऊसाहेब डोलनर यांनी वीज कनेक्शन बंद करण्याच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली. पिंपळगाव खांड धरणाचे रोटेशन सोडलेले नसताना शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कसे तोडता? आधी रोटेशन शिंदोडीपर्यंत सोडा, त्यानंतरच वीज कनेक्शन बंद करण्याचा विचार करा, अशी मागणी त्यांनी केली.

बंधाऱ्यांमध्ये पुरेसा पाणीसाठा नसल्याने शेतकऱ्यांनी स्वखर्चाने ढापे टाकून पाणी अडवले आहे. याच पाण्यावर उभी पिके, जनावरांचा चारा आणि पिण्याच्या पाण्याची गरज भागवली जात असल्याचे डोलनर यांनी सांगितले. वीज कनेक्शन बंद केल्यास शेतीचे नुकसान होण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली. या बैठकीला महावितरणचे साकूर येथील सहायक अभियंता राजेशकुमार झा यांच्यासह लहानु खेमनर, योगेश खेमनर, सुभाष डोंगरे, भाऊसाहेब सागर, नामदेव खेमनर, कैलास गाडेकर, उत्तम बुरके, अशोक सागर, आदम पटेल, गणेश सुपेकर, संतोष ढेंबरे, सुदाम सागर आदींसह नदीकाठच्या गावांतील शेतकरी उपस्थित होते.

पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देतानाच शेती आणि पशुधनाचाही विचार करून पर्यायी पाण्याचे नियोजन करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. पिंपळगाव खांड धरणाचे रोटेशन मिळाल्याशिवाय वीज कनेक्शन बंद करू नये, या मागणीवर शेतकरी ठाम असून, जलसंपदा विभाग आणि महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे त्यांचे लक्ष लागले आहे.

अर्थमंत्री निर्मला सितारमन यांचे पतीच निवडणूक आयोगाविरोधातील आंदोलनात उतरणार



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

निवडणूक आयोगाच्या एसआयआर प्रक्रियेविरोधात आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी देशभरात विरोधक आंदोलन करत आहेत. सीजेपी आणि काँग्रेसने सुरू केलेल्या आंदोलनामुळे केंद्र सरकारवर दबाव वाढत असतानाच आता केंद्रीय मंत्री निर्मला सीतारमण यांचे पतीही या आंदोलनात उतरणार आहेत. अर्थतज्ज्ञ परकला प्रभाकर हे २३ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या एसआयआर विरोधी आंदोलनात सहभागी होणार आहेत. स्वतः परकला प्रभाकर यांनी आपल्या एक्स हँडलवरून याबाबतची माहिती दिली आहे.

१४ ऑक्टोबर रोजी स्थापन झालेल्या 'पीपल अगेन्स्ट एसआयआर' कडून या आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे. विद्यार्थी, युवक, शेतकरी, कामगार, महिला, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, दिव्यांगजन, ट्रान्सजेंडर आणि इतर लोकांनी मिळून हा गट स्थापन केला आहे.

या गटाकडून २३ ऑक्टोबर रोजी मोर्चा काढला जाणार आहे. लोकशाहीची पुर्नस्थापना आणि देशभरात सगळीकडे जंतर-मंतर सारखे आंदोलन करणे, हा या मोर्चाचा उद्देश असल्याचे सांगितले जाते. 'हर हाथ तिरंगा, हर गली जंतर-मंतर' ही घोषणा या गटाकडून देण्यात आली आहे. प्रत्येक भारतीयाच्या हाती तिरंगा आणि प्रत्येक गल्लीत जंतर-मंतर करण्याचा मानस यातून व्यक्त करण्यात आला आहे.

कॉक्रोच जनता पार्टीचे

संस्थापक अभिजीत दिपके, अभिनेते-कार्यकर्ते प्रकाश राज, ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण आणि आयसाच्या अध्यक्षा नेहा बोरा यांच्यासह परकला प्रभाकर एकाच मंचावर येतील. शेतकरी नेते राकेश टिकैत, महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी आणि जेएनयूच्या विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा आएशी घोषही या मोर्चात सहभागी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

या मोर्चात सहभागी होण्यासाठी इंडिया आघाडीतील पक्षांनाही निमंत्रण देण्यात आले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घेऊन त्यांच्याविरोधात खटला चालविण्यात यावा, तसेच विद्यमान एसआयआर प्रक्रियेला रद्दबातल करावे आणि डिलीट केलेल्या मतदारांचे नाव पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करावे, अशाप्रकारची मागणी या मोर्चाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

परकला प्रभाकर यांनी यापूर्वीही केंद्र सरकारच्या धोरणावर टीका केलेली आहे. नुकतेच त्यांनी एसआयआर प्रक्रियेवर आसूड ओढले. ही प्रक्रिया म्हणजे 'नागरिकांचा रक्तहीन राजकीय संहार' आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. ते पुढे म्हणाले, जर्मनी, रवांडा अशा देशांमध्ये जिथे धर्म, वांशिकता, भाषा किंवा वर्णावरून लोकांचा छळ केला गेला. त्याउलट भारतात लोकांचा मतदानाचा हक्क हिरावून त्यांना लोकशाही प्रक्रियेच्या बाहेर फेकण्यात येत आहे.

परकला प्रभाकर यांच्यामते, एसआयआर प्रक्रियेमुळे लोकांचा मतदानाचा हक्क हिरावला जात असून यामुळे देशात दोन प्रकारचे लोक निर्माण होत आहेत. एक ज्यांना मतदानाचा हक्क आहे आणि दुसरा म्हणजे ज्यांना मतदानाचा अधिकार नाही.

कोण आहेत परकला प्रभाकर?

अर्थतज्ज्ञ असलेले परकला प्रभाकर हे राजकीय आणि सामाजिक विश्लेषक आहेत. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे पती असलेले परकला प्रभाकर यांनी यापूर्वीही अनेकदा केंद्र सरकारवर टीका केली होती. भारतातील लोकशाही आणि सामाजिक घडामोडींवर ते नेहमीच अभ्यासू चर्चा किंवा भाष्य करत असतात.

पान १ वरून

जिल्हा बँकेत बिनविरोधचा बार फुसका!

ठेवल्याने प्रतापसिंह पाचपुते आणि पानसरे यांच्यात थेट सामना रंगणार आहे. या मतदारसंघात १६८ मतदार असल्याने त्यांची भूमिका निकालासाठी महत्त्वाची ठरणार आहे. स्थानिक राजकीय समीकरणे, सहकारी संस्थांमधील संपर्क आणि मतदारांची बांधणी यावर विजयाचे गणित अवलंबून असेल.

राहुरीत तनपुरे-कदम संघर्षाकडे लक्ष

राहुरी सोसायटी मतदारसंघात माजी मंत्री तथा आमदार प्राजक्त तनपुरे आणि देवळाली प्रवरा नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्यात लढत होत आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रासह राजकीय वर्तुळाचे लक्ष या मतदारसंघाकडे लागले आहे. तनपुरे यांचा तालुक्यातील विविध विकास सेवा सोसायट्यांशी असलेला संपर्क, गावपातळीवरील कार्यकर्त्यांचे जाळे आणि दोन्ही उमेदवारांची मतदारांपर्यंत पोहोच या बाबी निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

पारनेरमध्ये खासदार लंके विरुद्ध राहुल शिंदे

पारनेर सोसायटी मतदारसंघातील लढत जिल्ह्याच्या राजकारणात विशेष चर्चेचा विषय ठरणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाचे खासदार नीलेश लंके यांच्याविरोधात भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे मैदानात उतरले आहेत. शिंदे यांना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या समर्थकांचे पाठबळ असल्याने या लढतीत दोन्ही बाजूंची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

या मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) आमदार काशिनाथ दाते, गीतांजली शेळके आणि प्रशांत गायकवाड यांनी माघार घेतली आहे. त्यामुळे लंके विरुद्ध शिंदे असा थेट सामना रंगणार आहे. यापूर्वीच्या तीन पंचवार्षिक निवडणुकांमध्ये पारनेर तालुक्यातून दोन संचालक निवडून जात होते; मात्र यंदा एकाच संचालकाला संधी मिळणार असल्याने स्पर्धा अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

विखे-थोरातांची रणनीती फिस्कटली; तीन पॅनलची चर्चा

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विखे आणि थोरात गटाकडून रणनीती आखण्यात आल्याची चर्चा होती. मात्र, अंतिम टप्प्यात सहमती न झाल्याने बिनविरोध निवडीचे प्रयत्न यशस्वी ठरले नाहीत. परिणामी, विखे-थोरात आघाडी, खासदार नीलेश लंके व शिंदेसेना आणि सभापती राम शिंदे यांच्याशी संबंधित उमेदवार अशा तीन गटांच्या राजकीय समीकरणांची चर्चा रंगू लागली आहे. महिला आणि ओबीसी प्रवर्गातील जागांवरही विविध गटांचे समर्थक रिंगणात असल्याने या जागांवरील लढतींकडे लक्ष लागले आहे.

एकूणच, जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत बिनविरोधचा मार्ग बंद झाल्याने आता मतांची जुळवाजुळव, ठरावधारकांचे पाठबळ आणि राजकीय नेत्यांची रणनीती यांची कसोटी लागणार आहे. आठ जागांवरील बिनविरोध निवडीने काही प्रमाणात दिलासा मिळाला असला, तरी उर्वरित १३ जागांवरील लढती जिल्ह्याच्या सहकार राजकारणाला नवे वळण देण्याची शक्यता आहे. त्यामुळे निवडणुकीच्या निकालातून जिल्हा बँकेच्या सत्तेची सूत्रे कोणाच्या हाती जाणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आह

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
हेल्थ इंडिया इन्शुरन्स
FHPL हेल्थ इन्शुरन्स
इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
बजाज आलियांज इन्शुरन्स
एसबीआय जनरल इन्शुरन्स
ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
मेडसेव टीपीए प्रा.लि.
जेनिन्स इंडिया टीपीए लि.
ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
टाटा एआयजी इन्शुरन्स
रिलायन्स जनरल इन्शुरन्स
मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
नॅशनल इन्शुरन्स कं.
न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
युनायटेड हेल्थकेअर लि.
Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
एम.डी.इंडिया हेल्थकेअर
विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग: अतिदक्षता विभाग • अपघात विभाग
डायलिसीस विभाग: सुपर स्पेशालिटी विभाग • न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग: मेडिसीन विभाग • अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट: स्पाईन सर्जरी • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist

डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

कै. छबुबाई देवराम सांगळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

आजी, तुमच्या आठवणींचा सुगंध आजही मनात दरवळतो! आजी-नातवंडांच्या प्रेमळ ऋणानुबंधांचा हृदयस्पर्श कळतो



काही नाती रक्ताच्या नात्यापलीकडे जाऊन मनाच्या गाभाऱ्यात कायमची घर करून राहतात. आजी आणि नातवाचे नाते हे त्यापैकीच एक! आजीच्या मायेची ऊब, तिच्या हातच्या गोडधोडाची चव, तिच्या प्रेमळ शब्दांचा आधार आणि तिच्या पदराखाली अनुभवलेली सुरक्षितता या आठवणी आयुष्यभर मनाला उभारी देत राहतात. काळ पुढे सरकतो, बालपण मागे पडते, माणूस मोठा होतो; पण आजीच्या मायेने समृद्ध झालेले बालपण मनाच्या कोपऱ्यात कायम जिवंत राहते. संगमनेर तालुक्यातील सोनेवाडी येथील कै. छबुबाई देवराम सांगळे आणि त्यांचे नातू इंजिनिअर तुषार गिते यांच्या नात्यातही असाच मायेचा, जिव्हाळ्याचा आणि अतूट ऋणानुबंधांचा सुगंध दरवळत होता.

संघर्षातून फुलवलेला संसार अन् संस्कारांचा वारसा -

एकेकाळी दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या सोनेवाडीसारख्या भागात छबुबाईंनी पती देवराम सांगळे यांच्या साथीने अनेक संकटांवर मात करीत संसाराचा गाडा समर्थपणे पुढे नेला. दोन मुले आणि तीन मुली अशा परिवाराची जबाबदारी सांभाळताना त्यांनी केवळ संसार फुलवला नाही, तर आपल्या मुलांच्या मनात चांगले संस्कारही रुजवले. परिस्थिती प्रतिकूल असली, तरी मनातील जिद्द, कष्ट करण्याची तयारी आणि कुटुंबावरील निस्सीम प्रेम यांच्या बळावर त्यांनी जीवन समृद्ध केले.

त्या काळच्या मर्यादांमुळे मुलांना उच्च शिक्षण देण्याच्या संधी कमी होत्या; मात्र आपल्या मुलांनी आणि नातवंडांनी शिकावे, मोठे व्हावे, स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि आपल्या कर्तृत्वाने कुटुंबासह गावाचेही नाव उज्ज्वल करावे, ही त्यांची मनापासून इच्छा होती. त्यांच्या संस्कारांच्या वेलीवर आज नातवंडे विविध क्षेत्रांत यशाची फुले उमलवत आहेत. त्यांच्या आयुष्याकडे पाहिले, की जाणवते-काही माणसे स्वतःच्या कर्तृत्वापेक्षा पुढच्या पिढीच्या यशात आपले खरे समाधान शोधतात.

लाडक्या नातवाच्या बालपणातील मायेचा स्वर्ग -

इंजिनिअर तुषार गिते हे छबुबाईंच्या सर्वांत मोठ्या कन्या सौ. मिनाबाई भाऊसाहेब गिते यांचे पुत्र. सोनोशी हे गाव जवळ असल्याने तुषार यांचे बालपण आजी-मामांच्या सहवासात आनंदाने फुलले. आजीच्या घरी जाणे म्हणजे त्यांच्यासाठी जणू आनंदाची पर्वणीच असायची. तिथे प्रेम होते, लाड होते, गोडधोड होते आणि शेतातील रानमेव्याची अवीट चवही होती. त्या छोट्या-छोट्या गोष्टींमध्येच बालपणाचा खरा आनंद सामावलेला होता.

आजी धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यामुळे त्यांच्या सहवासातून तुषार यांना लहानपणापासूनच धार्मिकतेबरोबरच कुटुंबप्रेम, आदर, आपुलकी आणि चांगल्या संस्कारांची शिदोरी मिळाली. आजीचे प्रेम हे केवळ लाड करण्यापुरते मर्यादित नव्हते; त्या प्रेमातून जीवनाकडे पाहण्याची दृष्टी घडत होती. त्यांच्या सहवासातील प्रत्येक क्षण तुषार यांच्या मनावर संस्कारांची अमीट छाप उमटवत होता.

एकत्र कुटुंब हीच खरी शक्ती, यावर छबुबाईंचा दृढ विश्वास होता. सुख असो वा दुःख, त्यांनी कुटुंबाला नेहमी एकत्र ठेवण्याचा प्रयत्न केला. आयुष्यात अनेक चढउतार आले, संघर्ष करावा लागला; पण त्यांनी कधी परिस्थितीपुढे हार मानली नाही. स्वतःच्या वाट्याला आलेल्या कष्टांपेक्षा मुलांचे आणि नातवंडांचे सुख त्यांच्यासाठी अधिक महत्त्वाचे होते. हीच त्यांची श्रीमंती होती.

नातवाच्या यशाचा आनंद पाहण्याची अपुरी राहिलेली इच्छा

काळाच्या ओघात तुषार यांचे बालपण सरले. शिक्षण पूर्ण झाले आणि ते इंजिनिअर झाले. आयुष्याच्या नव्या वाटा खुल्या झाल्या. स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी त्यांनी वाटचाल सुरू केली. मात्र या प्रवासात मनाच्या एका कोपऱ्यात आजीच्या डोळ्यांतील अभिमान पाहण्याची, आपल्या यशाची बातमी त्यांना सांगण्याची आणि त्यांच्या आशीर्वादाने पुढे जाण्याची ओढ कायम होती.

आपण मोठे होताना आपल्यावर जीवापाड प्रेम करणारी माणसे आपल्याला सोडून जातील, याची कल्पना बालपणी कधीच येत नाही. मोठे झाल्यावर त्यांच्यासाठी आणखी काहीतरी करावे, त्यांच्यासोबत अधिक वेळ घालवावा, मनातील भावना व्यक्त कराव्यात, असे वाटते; पण नियती प्रत्येकाला ही संधी देईलच असे नाही.

१४ ऑक्टोबर २०२६ रोजी छबुबाईंनी जगाचा निरोप घेतला आणि तुषार यांच्या आयुष्यातील मायेचा एक अनमोल आधार हरपला. आजीच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी शब्दांत मांडणे कठीण आहे. डोळे मिटले की त्यांचा प्रेमळ चेहरा आठवतो, त्यांच्या सहवासातील बालपण पुन्हा डोळ्यांसमोर उभे राहते. एखादी गोड आठवण ओठांवर हसू आणते, तर पुढच्याच क्षणी त्यांच्या नसण्याची जाणीव डोळ्यांत अश्रू आणते. आजी, तुम्ही माझ्यासोबत आणखी काही वर्षे असायला हवे होते. माझ्या यशाचे क्षण तुम्हाला दाखवायचे होते, तुमच्याशी मनसोक्त बोलायचे होते आणि तुमच्या मायेच्या सावलीत आणखी काही काळ विसावायचे होते, ही भावना तुषार यांच्या मनात आजही घर करून आहे.



माणूस जातो; पण त्याची माया कायम राहते!

आजीचे जाणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचे दूर जाणे नव्हे, तर बालपणाशी जोडलेला जिव्हाळ्याचा एक सुंदर अध्याय संपणे होय. मात्र प्रेमाने जगलेली माणसे कधीच पूर्णपणे दूर जात नाहीत. त्यांचे विचार, संस्कार, आठवणी आणि त्यांनी दिलेली शिकवण पुढच्या पिढ्यांच्या आयुष्यात सतत मार्गदर्शन करीत राहते.

इंजिनिअर तुषार गिते यांच्यासाठी कै. छबुबाई सांगळे या केवळ आजी नव्हत्या; त्या त्यांच्या बालपणाचा आनंद, प्रेमाचा आधार, संस्कारांचे विद्यापीठ आणि आयुष्यभर प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होत्या. आज त्या प्रत्यक्ष सोबत नसल्या, तरी त्यांच्या आठवणी तुषार यांच्या प्रत्येक यशात आणि प्रत्येक कठीण प्रसंगात त्यांना धीर देत राहतील. आजीच्या प्रेमाची परतफेड करणे कधीच शक्य नसते; मात्र त्यांनी दिलेले संस्कार जपत जगणे, कुटुंबाला एकत्र ठेवणे आणि आपल्या कर्तृत्वाने त्यांचे नाव उज्ज्वल करणे, हीच त्यांना वाहिलेली खरी श्रद्धांजली ठरते. आज तुषार यांच्या मनात एकच भावना दाटून येते-आजी, तुम्ही नजरेआड झालात; पण मनाआड कधीच होणार नाहीत. तुमच्या हातच्या गोडधोडाची चव, तुमच्या मायेची ऊब आणि तुमच्या सहवासातील बालपण माझ्या आयुष्यातील सर्वांत सुंदर ठेवा राहील.

तुम्ही गेलात, पण तुमची माया गेली नाही. तुमचा सहवास संपला, पण तुमच्या आठवणींचा प्रवास थांबला नाही. तुमचे आशीर्वाद आणि संस्कार माझ्या आयुष्याच्या प्रत्येक वळणावर माझ्यासोबत राहतील.

कै. छबुबाई सांगळे यांच्या पवित्र स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली! त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

इंजि. तुषार गिते
सोनोशी, ता. संगमनेर

॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

आजी तुझी माया

आठवणी तुझ्या
डोळ्यांत पाणी
मनात घरटे...

तुझीच माया
तुझाच आधार
तुझीच सावली...

बालपण माझे
तुझ्या कुशीत
स्वर्गच होते...

तू दूर गेलीस
आठवण राहिली
माया अमर...

आजी गं तुझ्या
स्मृतींना वंदन
भावपूर्ण श्रद्धांजली...



